NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 35) 15th March 2010 (No : 2

(3)

*संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ*

# सहाव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांची वेतन निश्चिती करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने दिनांक ८.२.२०१० रोजीच्या बैठकीत पारीत केलेला ठराव

१. व्यवस्थापन परिषदेच्या दि.८.२.२०१० रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा. सहसंचालक यांनी विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिनांक २५ जानेवारी २०१० रोजी पाठविलेल्या पत्र क्रमांक ससं/उशि/लले/१०/३२३ चे अवलोकन करण्यात आले (याला यापुढे सहसंचालकांचे उक्त पत्र म्हणू)

२. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने या कामासाठी गठीत केलेल्या समितीने दिनांक १६ ते २७ नोव्हेंबर, २००९ या कालावधीत १३७ अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांची वेतन निश्चिती सहाव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयाच्या परिच्छेद १२ (१) प्रमाणे पूर्ण करून ती महाविद्यालयाच्या मार्फत सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांचेकडे वेतन निश्चितीसाठी पाठविली आहेत.

३. मा. सहसंचालकांच्या उक्त पत्राचे अवलोकन केले असता त्यांनी शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता आपल्या स्तरावर शासननिर्णयच दुरुस्त केलेला आहे, असे स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या या पत्रात विद्यापीठाने वेतन निश्चिती केल्यानंतर महाविद्यालयांकडून या कार्यालयास प्राप्त झालेली शिक्षक कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती प्रकरणे मंजूर करण्याचे काम जवळजवळ पूर्ण झाले असून काही प्रकरणांमध्ये त्रुटी आढळल्यामुळे ही प्रकरणे संबंधित महाविद्यालयास त्रुटींच्या पूर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेली आहेत असा उल्लेख असून पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या आदेशानुसार वेतन निश्चितीचे काम विहीत मुदतीत पूर्ण करावयाचे असल्यामुळे त्रुटीपूर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेली प्रकरणे तात्काळ प्राप्त करून घेवून त्यावर त्वरीत कार्यवाही करून ती या कार्यालयास पुढील कार्यवाहीकरिता तातडीने सादर करण्यात यावीत.

४. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करतांना १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार संबंधित शिक्षकाचे १.१.२००६ चे मूळ वेतन विचारात घेऊन वेतन निश्चिती करावयाची आहे, ही शासननिर्णयाची तरतुद सहसंचालकांच्या लक्षातच आली नाही असे स्पष्टपणे दिसून येते.

५. वेतन निश्चितीसाठी शासन निर्णयाप्रमाणे दि.१.१.२००६ चे मूळ वेतन विचारात घ्यावयाचे असून तेथूनच वेतन निश्चितीच्या प्रक्रियेस सुरूवात होते. हे मुळ वेतन खुद्द सहसंचालकांनी मान्य करुन दिलेले वेतन आहे व वर्षानुवर्षे वेतन योजनेच्या माध्यमातून ते त्या शिक्षकाला दिल्या जात आहे ही गोष्ट खुद्द सहसंचालकांच्याच लक्षात राहिलेली नाही असे दिसून येते.

(1)

## कार्यालय, सहसंचालक (उच्च शिक्षण)

**अमरावती विभाग, अमरावती-४४४ ६०४**

दुरध्वनी क्रमांक ०७२१ - २५३१२३५

*क्रमांक ससं/उशि/लले/१०/३२३ दिनांक २५.१.२०१०*

प्रति,
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

**विषय :-** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू झालेल्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत.

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३६६३, दिनांक ७.२.२००९
२. शासन पत्र क्रमांक संकीर्ण ०९/(५३६/०९)/विशि-१, दिनांक १५.१२.२०१०

महोदय,

कृपया संदर्भाधीन पत्राचे अवलोकन करावे. आपल्या विद्यापीठाने वेतन निश्चिती केल्यानंतर महाविद्यालयांकडून या कार्यालयास प्राप्त झालेली शिक्षक कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितीची प्रकरणे मंजूर करण्याचे काम जवळ जवळ पूर्ण झाले असून काही प्रकरणांमध्ये त्रुटी आढळल्यामुळे ही प्रकरणे संबंधित महाविद्यालयास त्रुटींच्या पूर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेली आहेत. **शासनाच्या आदेशानुसार वेतन निश्चिती काम विहित मुदतीत पूर्ण करावयाचे असल्यामुळे त्रुटीपुर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेली प्रकरणे तात्काळ प्राप्त करुन घेऊन त्यावर त्वरित कार्यवाही करुन ती या कार्यालयास पुढील कार्यवाहीकरिता तातडीने सादर करण्यात यावीत.**

तसेच, संदर्भ क्रमांक १ च्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रकरणांवर वेतन निश्चितीचा शिक्का उमटविण्यात यावा.

सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग, अमरावती.

** FS:P 47 **

(2)

### *संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.*

*क्र.संगाबाअवि/बीसीसी/७७/२०१०*

**दिनांक - ९ फेब्रूवारी, २०१०**

प्रति,
सहसंचालक (उ.शि.)
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय -** विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांची वेतन निश्चिती.

**संदर्भ -** १) सहसंचालक (उ.शि.) पत्र क्र.संसं/उ.शि./लले/१०/३२३ दि.२५.१.२०१०
२) प्राचार्य, ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावती यांना सहसंचालक (उ.शि.) यांना पाठविलेले पत्र क्र.ससं/उ.शि./अनुदान/वेतन निश्चिती/९/२९५ दि.२२.१.२०१०.

महोदय,

संदर्भांकित उपरोक्त नमूद केलेले पत्र, समिती क्र.१४/२००९ च्या ठरावासह व्यवस्थापन परिषदेच्या दि.८.२.२०१० रोजी संपन्न झालेल्या सभेसमोर बाब क्र.४८ अन्वये ठेवण्यात आले. याअनुषंगाने व्यवस्थापन परिषदेने सहाव्या वेतन आयोगात शिक्षकांची वेतन निश्चिती करताना सहसंचालक कार्यालयाकडून होत असलेल्या दिरंगाईबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करून सोबत जोडलेला ठराव पारीत केला. **या ठरावाची प्रत यासोबत आपणाकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात येत आहे.**

आपला
सहपत्र - ठरावाची प्रत
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

** FS:P 49 **

६. सहसंचालकांनी मान्य करुन दिलेले व त्या शिक्षकाला प्रत्यक्ष मिळत असलेले दिनांक १.१.२००६ रोजीचे मूळ वेतन १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद 8(A) (b), चे तसेच "Proforma of fixation of pay" (Appendix IV) च्या Sr.No.4 वर "Existing emoluments as on 1.1.2006" चे तंतोतंत पालन विद्यापीठाने केलेले असून त्या आधारावर संबंधित शिक्षकाचे त्याच्या मूळ सेवापुस्तिकेवरून दि.१.१.२००६ च्या मूळ वेतनाची खात्री करून घेऊनच विद्यापीठाने बिनचूकपणे वेतननिश्चिती केलेली आहे व त्यात कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही व एकदा विद्यापीठाने हे काम हातावेगळे केल्यानंतर त्याबाबतचा पुढील निर्णय हा संहसंचालकांनीच घ्यावयाचा आहे.

७. विद्यापीठाने शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करुन शिक्षकांची वेतन निश्चिती करताना या शासन निर्णयातील वेतन निश्चितीसाठी असलेल्या संपूर्ण तरतुदीचे काटेकोरपणे पालन केले असून हे काम बिनचूकपणे व विहीत मुदतीत पूर्ण केलेले आहे. आता सहसंचालक कार्यालयाकडून शासन निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे प्रत्येक प्रकरणी पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

१) प्रकरण त्यांनी जसेच्या तसे मान्य करावे, किंवा

२) ते प्रकरण कारणे देवून अमान्य करावे, किंवा

३) कारणे नमूद करुन त्यात आवश्यक त्या दुरुस्तीसह त्या प्रकरणास मान्यता द्यावी.

८. वरील प्रमाणे कारवाई न करता सहसंचालकांनी त्यांना तसा कुठलाही अधिकार नसतांना १२ ऑगस्ट २००९ चा सदर शासन निर्णय दुरूस्त करून त्यात १२ (१), व (२) नंतर एक नवीन परिच्छेद स्वतःच्या स्तरावर जोडला असे दिसून येत आहे. त्यांच्या या परिच्छेदाचे स्वरूप असे आहे की, परत पाठविण्यात आलेली प्रकरणे (विद्यापीठाने) तात्काळ प्राप्त करून घेवून त्यावर त्वरीत कार्यवाही करून ती या कार्यालयास पुढील कार्यवाहीकरिता तातडीने सादर करण्यात यावी. ही त्यांनी नमूद केलेली प्रक्रिया दिनांक १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयात कुठेही नसल्याने संपूर्णपणे अमान्य करण्यात येत असून त्यांच्या या कृतिमुळे पुढील प्रमाणे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.

१) त्यांनी शासन निर्णयात स्वस्तरावर केलेल्या दुरुस्तीमुळे विद्यापीठाकडे ही प्रकरणे कोणी पाठवावयाची आहेत?

२) सहावा वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती प्रक्रियेत अजिबात अभिप्रेत नसलेल्या ज्या उणिवा काल्पनिकरित्या त्यांनी काढलेल्या आहेत त्यांची पूर्तता कोणी करावयाची आहे?

९. सहसंचालकांना विद्यापीठाला आदेश देण्याचा अधिकार नाही याचेही भान त्यांना राहिलेले नाही. या संदर्भात विद्यापीठात होत असलेले काम शासननिर्णयानुसार व मा. कुलगुरुंनी विद्यापीठ कायद्यातील कलम १४ (८) अन्वये निर्गमित केलेल्या निदेशानुसार होत आहे व होत असते याचेही भान त्यांना राहिलेले नाही. त्यांची याबाबतची धारणा संपूर्णपणे कायद्यातील तरतुदींशी विसंगत अशी आहे याची स्पष्ट जाणीव या ठरावाद्वारे सहसंचालकांना करून देण्यात येत आहे.

१०. यापूर्वी चवथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीचे काम शिबिरे घेवून करण्यात आले होते याचे मुख्य कारण म्हणजे शिबिरे घेऊन तेथल्या तेथे प्रकरणे निकाली काढण्याच्या प्रक्रियेत भ्रष्टाचाराला वाव राहत नाही. सहाव्या वेतन आयोगातील वेतन निश्चितीचे काम सुद्धा शिबिरे लावून करण्याचे अपेक्षित असतांना, सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीचे काम शिबीरे लावूनच करण्यात येईल असे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण मंत्र्यांनी विधान परिषदेत आश्वासन दिलेले असतांना त्याची सुद्धा आठवण या सहसंचालकांना असू नये ही गोष्ट त्यांचे बेपर्वाईचे वर्तन दर्शविणारी आहे.

११. शासन निर्णयाच्या परिच्छेद 8(A) (b), चे तसेच "Proforma of fixation of pay" (Appendix IV) च्या Sr.No.4 वर "Existing emoluments as on 1.1.2006" प्रमाणे दि.१.१.२००६ च्या मूळ वेतनाची खात्री करून घेऊनच या कामाला सुरूवात करावी लागते ते मुळ वेतन आपणच मान्य करुन दिलेले आहे त्यातच काही चूक आहे अशी भावना मनात धरुन काम करतो म्हटले तर अशा तृटी काढण्यात संहसंचालकांची दोन तिन वर्षे निघून जातील व त्यांचे ते कृत्य शासननिर्णयाच्या विरोधात असेल याची त्यांना जाणिव करुन देण्यात येत आहे.

१२. संबंधित शिक्षकाचे त्याच्या मूळ सेवापुस्तिकेवरून दि.१.१.२००६ च्या मूळ वेतनाची खात्री करून घेऊनच विद्यापीठाने बिनचूकपणे संगणक प्रणालीद्वारे शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगात वेतन निश्चिती केली असून त्यामध्ये कुठल्याही प्रकारची त्रुटी नाही हे आम्ही ठामपणे नमूद करीत आहोत. त्यामुळे ती प्रकरणे त्रुटीपुर्तता करून परत पाठविण्याचे काम करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तशी फिरवा फिरवीची प्रक्रिया शासननिर्णयात कोठेही नाही, असे त्यांना स्पष्टपणे कळविण्यात येत आहे.

१३. दि.१२ ऑगस्ट, २००९ चा शासन निर्णय व दि. ३.१०.२००९ चे संचालक (उ.शि.) यांचे क्र. उशिसं/४००९/ ६वा वेतन आयोग / परीपत्रक / विशी चे पत्र व उपरोक्त बाबी लक्षात घेता विद्यापीठाने सहाव्या वेतन आयोगाच्या बाबतीत आपल्या स्तरावरील अंतिम कारवाई बिनचुकपणे पार पाडलेली आहे. शासननिर्णयात स्वतःच दुरुस्ती करुन सहसंचालकांनी केलेली विनंती अमान्य करण्यात येत आहे.

१४. सहसंचालकांच्या कार्यालयातर्फे ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन निश्चिती प्रकरणांमध्ये सहसंचालकांनी त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पाठविलेले पत्र क्रमांक ससं/उशि/अनुदान/वेतननिश्चिती/९/२९५ दिनांक २२.१.२०१० चे अवलोकन व्यवस्थापन परिषदेने केले. पाठविण्यात आलेल्या या तृटीपत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता त्यात तृटी क्रमांक २२ मध्ये "रुपये ३७०० - ५७०० या वेतन श्रेणीत केलेली स्थाननिश्चिती करतांना ती दिनांक ४.८.२००६ ला करण्यात येवून पुढील वेतनवाढ १ जुलै २००७ ला वेतन निश्चिती प्रपत्रात दर्शवावी" असे नमूद केले आहे. वास्तविक ही वेतनश्रेणी चवथ्या वेतन आयोगातील वेतन श्रेणी असून सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीत सदर श्रेणीचा उल्लेख नाही असे असतांना सहसंचालक कार्यालयातर्फे मात्र ती तृटी दर्शविण्यात येणे ही बाब त्या कार्यालयात कामकाज किती शुद्धीवर राहून केल्या जात आहे हे दर्शविणारे आहे. संपूर्ण तृटी पत्रक अशाच नमून्यांनी भरले असून नेमके सहाव्या वेतन आयोगाच्या शासननिर्णयाप्रमाणे सोपविलेले वेतन निश्चितीचे काम सहसंचालकांनी बाजूला ठेवले आहे व शासननिर्णयानी न सांगितलेले काम सहसंचालकांच्या कार्यालयात जोरात सुरु आहे असे दिसून येते. त्यांनी शेकडो प्रकरणे महाविद्यालयांकडे परत पाठविली आहेत व त्यामुळे या शेकडो शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे व ते सतत विद्यापीठात चौकशी करीत आहेत. या स्थितीत त्यांनी या ठरावाच्या परिच्छेद ६ व ७ मध्ये नमूद केलेली कार्यवाही शासन निर्णयातील तरतुदीनुसार पार पाडावी अशी सूचना त्यांना या ठरावाद्वारे करावीशी वाटते.

उपरोक्त ठराव सहसंचालक (उ.शि.), अमरावती विभाग, अमरावती यांना त्वरीत कळवावा असे परिषदेने निर्देश दिलेत.

*** FS:P 51 ***

## वेतन निश्चिती प्रक्रिया पूर्ण होण्याबाबतचा घटनाक्रम

**"शासनाच्या आदेशानुसार वेतन निश्चिती काम विहित मुदतीत पूर्ण करावयाचे असल्यामुळे त्रुटीपुर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेली प्रकरणे तात्काळ प्राप्त करून घेऊन त्यावर त्वरित कार्यवाही करून ती या कार्यालयास पुढील कार्यवाहीकरिता तातडीने सादर करण्यात यावीत."** अशी विद्यापीठाला सूचना करणारे मा. सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग अमरावती यांचे दिनांक २५ जानेवारी २०१० चे पत्र ***क्रमांक १ म्हणून (पृष्ठ १३ वर)*** दिलेले आहे. विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने याबाबत दिनांक ८ फेब्रुवारी २०१० रोजी घेतलेला निर्णय ***क्रमांक ३ म्हणून (पृष्ठ १३ वर)*** दिलेला असून कार्यकारी परिषदेचा निर्णय मा. सहसंचालकांना कळविणारे मा. कुलसचिवांचे दिनांक ९ फेब्रुवारी २०१० चे पत्र ***क्रमांक २ म्हणून (पृष्ठ १३ वर)*** दिलेले आहे.

नुटाचे सहसचिव डॉ. प्रविण रघुवंशी यांनी मा. संचालक उच्च शिक्षण पुणे यांना लिहिलेले १५ फेब्रुवारी २०१० चे पत्र, ***क्रमांक ४ म्हणून (पृष्ठ १५ वर)*** दिलेले आहे. संघटनेचे अध्यक्ष व विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी मा. संचालकांना लिहिलेले दिनांक १७ फेब्रुवारी २०१० चे पत्र ***क्रमांक ५ म्हणून (पृष्ठ १६ वर)*** दिलेले आहे.

तृटीपत्रांच्या बाबतीत **"सदर पत्र व त्यासोबत देण्यात आलेली प्रपत्रे याद्वारे रद्द करण्यात येत आहे"** असे सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना १७ फेब्रुवारी २०१० च्या पत्रान्वये मा. सहसंचालक यांनी कळविले. ते पत्र ***क्रमांक ६ म्हणून (पृष्ठ १७ वर)*** दिलेले आहे. **"सदर पत्र याद्वारे रद्द करण्यात येत आहे"** असे मा. संचालक उच्च शिक्षण यांनी विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिनांक १७ फेब्रुवारी २०१० रोजी कळविले ते पत्र ***क्रमांक ७ म्हणून (पृष्ठ १७ वर)*** दिलेले आहे. प्रत्येक पत्र हे स्वयंस्पष्ट आहे - **संपादक**

(4)

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.

Regn. No. F-1594 & Soc. Regn. Act. Regn. No. MAH-15-73(NGP)

**From : Dr.P.B.Raghuwanshi,** Joint Secretary, Buty Plot, Amravati.-444 606

**दि. १७ फेब्रुवारी, २०१०**

**प्रति,**
**मा.संचालक (उच्च शिक्षण)**
महाराष्ट्र राज्य,पुणे

**मार्फत** : सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय** : अमरावती विभागातील उच्च शिक्षण सहसंचालक यांचेकडून शासन निर्णयाचे तसेच वरिष्ठांच्या आदेशांचे वारंवार होत असलेले उल्लंघन.

**मा.महोदय,**

अमरावती विभागातील उच्च शिक्षण सहसंचालक हे महाराष्ट्र शासनाच्या उच्चशिक्षण विभागाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी निर्गमित केलेल्या दि. १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयाला पायदळी तुडवून स्वतःच्याच स्तरावर नवीन शासन निर्णय काढून त्यानुसार अमरावती विभागातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती मध्ये भ्रष्ट हेतुने वेठीस धरीत असल्यामुळे या भागातील शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. हे आपल्या लक्षात आणून देण्यासाठी मुद्दाम हे निवेदन सादर करीत आहे.

२. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करतांना दिनांक १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद 8(A) (b) (i) & (ii) व त्याचबरोबर शासन निर्णयासोबत परिशिष्ट ४ मध्ये जोडलेल्या वेतन निश्चिती करावयाच्या तीनही 'प्रोफार्मा'तील अनुक्रमांक ४ लक्षात घेता प्रत्येक शिक्षकाची **"दिनांक १ जानेवारी, २००६ रोजीची शासनमान्य अस्तित्वीय वित्तलब्धी" (Existing Emoluments as on 1.1.2006)** हा एक प्रमुख घटक आहे व तेथूनच पुढे वेतन निश्चितीची प्रक्रिया सुरु होते. सहाव्या वेतन आयोगात वेतन निश्चिती करतांना तेथूनच सुरुवात करावयाची आहे. ही शासन निर्णयातील तरतूद सहसंचालकांच्या लक्षातच आली नाही असे त्यांच्या त्यांनी दिनांक २५ जानेवारी २०१० रोजी विद्यापीठाला पाठविलेल्या पत्र क्र. ससं / उशि / लले / १० /३२३ वरून स्पष्टपणे दिसून येते. ***(सहपत्र-१, पृष्ठ क्र. १ पहा)***

३. शासननिर्णयाप्रमाणे स्वतःच्या स्तरावरील कारवाई पार न पाडता सहसंचालकांनी त्यांना तसा कुठलाही अधिकार नसतांना १२ ऑगस्ट २००९ चा सदर शासन निर्णय स्वतःच दुरूस्त करून त्यात १२ (१), व (२) नंतर एक नवीन परिच्छेद स्वतःच्या स्तरावर जोडला असे दिसून येत आहे. त्यांच्या या परिच्छेदाचे स्वरूप असे आहे की, **"परत पाठविण्यात आलेली प्रकरणे (विद्यापीठाने) तात्काळ प्राप्त करून घेवून त्यावर त्वरीत कार्यवाही करून ती या कार्यालयास पुढील कार्यवाहीकरिता तातडीने सादर करण्यात यावी."** ही त्यांनी नमूद केलेली प्रक्रिया दिनांक १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयात कुठेही नसल्याने त्याप्रमाणात त्यांनी त्यांच्या स्तरावर नवा शासननिर्णय काढला असे दिसून येते. खुद्द मा. उच्च शिक्षण संचालकांनी त्यांना ३.१०.२००९ च्या ***(सहपत्र ५)*** परिपत्रकान्वये **"विद्यापीठांनी सादर केलेल्या वेतननिश्चिती प्रस्तावासोबतची उपरोक्त नमूद केलेली सर्व प्रमाणपत्रे तपासून ती योग्य असल्याची खात्री करुन घेऊन संबंधितांची वेतन निश्चिती प्रमाणित करावी"** असे स्पष्ट आदेश दिले असतांना प्रस्तावासोबतची सर्व प्रमाणपत्रे तपासण्याचे काम सोडून ट्रकभर असंबद्ध कागदपत्रे गोळा करण्याचा उद्योग त्यांनी सुरु केला असून तसे करतांना अंतिमतः वेतननिश्चिती प्रमाणित करण्याचे काम ते प्राचार्यांकडे व तेथून विद्यापीठाकडे पाठवितात. एकदा सही शिक्क्यानिशी १ जानेवारी २००६ पूर्वी सहसंचालकांनी मान्य करुन दिलेल्या वेतननिश्चितीमध्ये बदल करण्याचा अधिकार प्राचार्यांना त्यांनी परत देणे पोरकटपणाचे आहे. शासनाला न विचारता व तसा शासननिर्णय नसतांना हे अधिकार विद्यापीठाला बहाल करण्याची त्यांची कृति कमालीची उद्धटपणाची होय. विद्यापीठाला परस्पर असे आदेश देण्याचा आपल्याला अधिकार नाही याची जाणिव त्यांना असू नये याचे आश्चर्य वाटते.

४. वेतन निश्चितीसाठी १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे दिनांक **१ जानेवारी, २००६ रोजीची शासनमान्य अस्तित्वीय वित्तलब्धी मुळ धरुन** त्यानुसार पुढील वेतननिश्चिती आपल्याला करावयाची आहे याचा त्यांना पूर्णपणे विसर पडला आहे. दिनांक १ जानेवारी, २००६ ची वित्तलब्धी खुद्द सहसंचालकांनीच मान्य करून दिलेली आहे व वर्षानुवर्षे वेतन योजनेच्या माध्यमातून ती त्या शिक्षकाला दिल्या जात आहे, या बाबीचा देखील सहसंचालकांना विसर पडलेला आहे असे दिसुन येते. विद्यमान सहसंचालक, पूर्वीचे सहसंचालक, त्यांच्या कार्यालयातील विद्यमान कर्मचारी, पूर्वीचे कर्मचारी यांनी १ जानेवारी २००६ पूर्वी काही भ्रष्टाचार केला असे त्यांनी गृहित धरले आहे. व **"१ जानेवारी २००६ रोजीची अस्तित्वीय वित्तलब्धी दुरुस्त करण्याचे काम"** जणू काही १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाने (यांच्याकडे न सोपविलेले हे काम) आपल्याकडे सोपविले आहे असे समजून त्यानी मोठ्या प्रमाणात ते काम हाती घेतले आहे. शासननिर्णयानी त्यांच्याकडे सोपविलेले काम मोठ्या प्रमाणात त्यामुळे बाजूला पडले आहे. त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या आपसातील हेव्या दाव्यातून ह्या बाबी निर्माण झाल्या असून त्यावर सहसंचालकांना नियंत्रण ठेवता येत नाही असे दिसून येत आहे.

५. संघटनेच्या वतीने आम्ही हे स्पष्ट करु इच्छितो की,

(अ) १ जानेवारी, २००६ पूर्वी एखाद्या सहसंचालकाने (विद्यमान सहसंचालकासह) आपल्या सही शिक्क्यानिशी मुद्दामहून भ्रष्टाचारी वृत्तीने किंवा अन्य वृत्तीने कुणाला जादा वेतन दिले असेल तर त्याबद्दल अशा अधिकाऱ्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. **मात्र त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करुन दोषी आढळल्यास त्यावर कारवाई केली पाहिजे.** १ जानेवारी, २००६ पूर्वी भ्रष्टाचार केलेल्या त्याच उच्च पदस्थाला १ जानेवारी २००६ नंतर तो भ्रष्टाचार दुरुस्त करण्याची संधी देणे म्हणजे आणखी भ्रष्टाचाराला वाव देणे होय.

(ब) संघटनेच्या वतीने आम्ही हेही स्पष्ट करु इच्छितो की, १ जानेवारी २००६ पूर्वी एखाद्या शिक्षकाला नियमाला सोडून काही जादाची रक्कम खरोखरच दिली गेल्यास त्याबाबत योग्य ती प्रक्रिया पार पाडून परतावा करण्यास कोणीही हरकत घेण्याचे काहीही कारण नाही. वर्षानुवर्षे सहसंचालकांनी सही शिक्क्यांनी मान्य करुन दिलेली शासनमान्य अशी **"१ जानेवारी २००६ रोजीच्या अस्तित्वीय वित्तलब्धी"** मध्ये काही कपात करावयाची असेल तर त्या शिक्षकाला कारणे दाखवा नोटीस द्यावी लागेल. त्याचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल व त्यानंतरच कपाती बाबतचा निर्णय घ्यावा लागेल हे त्याला विद्यापीठाच्या परिनियमांनी दिलेले संरक्षण आहे. शिवाय हा निर्णय सहसंचालकांच्या कार्यालयातील कारकुनांच्या किंवा सहसंचालकांच्या पातळीवर होणार नाही. त्याबाबतची कारवाई वरिष्ठाकडून किंवा वरिष्ठांनी नेमलेल्या अधिकाऱ्याकडूनच होऊ शकेल. त्याच सहसंचालकांनी व त्याच कार्यालयांनी हा प्रयत्न केल्यास प्रत्येक प्रकरणी उच्च न्यायालयात 'स्टे' साठी शिक्षकाला धाव घ्यावी लागेल. काही प्रकरणी असे 'स्टे' यापूर्वीच आलेले आहेत. हे सर्व फक्त अमरावती विभागातच चालु आहे.

६. शासन निर्णयांची व वरिष्ठांच्या आदेशाची सतत अवहेलना करण्याचा सहसंचालकांचा स्वभाव लक्षात घेण्यासारखा आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील विविध विषयांच्या निवड समितीवर विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी स्वतः उपस्थित राहू नये असे लेखी आदेश मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे असतांना (परिपत्रक क्र.उशिस /२००५ / परीप / स्थाननिश्चिती / मवि-१, दिनांक २८.३.२००५ - ***सहपत्र-२, पृष्ठ-२ पहा***) त्या आदेशाची अवहेलना करुन विद्यमान सहसंचालक अमरावती विभागातील विविध महाविद्यालयात अधिव्याख्यात्यांच्या निवड समितीवर उपस्थित तर राहतातच शिवाय विशिष्ट ठिकाणी विशिष्ट विषयांतील अधिव्याख्यात्यांच्या निवडीसाठी त्यांनी विशेष रस दाखविल्याचे दिसून येते. ***(सहपत्र-३, पृष्ठ क्र. ३ व ४ पहा)***

७. याच सहसंचालकांनी ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पाठविलेल्या (पत्र क्र. ससं / उशि/ अनुदान / वेतननिश्चिती /०९ / २९५ दिनांक २२.१.२०१०) ***(सहपत्र-४, पृष्ठ ५ ते ९ पहा)*** पत्राचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास अनेक विस्मयजनक बाबी समोर येतात.

(१) या प्रपत्रामध्ये श्री.ए.के. शेन्डे यांचे प्रकरणी त्रृटी प्रपत्रात *(पृष्ठ ७, अ.क्र. २२ पहा)* **"रु. ३७००-५७०० या वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करतांना ती ४.८.२००६ ची करण्यात येऊन त्यानंतर दिनांक १ जुलै २००७ ची वेतनवाढ वेतननिश्चिती प्रपत्रात दर्शवावी** " असे नमूद केलेले आहे. रु. ३७००-५७०० ही वेतनश्रेणी चवथ्या वेतन आयोगाची असून सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्याशी तिचा कुठलाही संबंध नसतांना अशी त्रृटी काढणे यावरून त्यांची कार्यपद्धती किती पोरकटपणाची आहे हे लक्षात येते. "ही त्रृटी नशापाणी न घेता तयार केली आहे" असे प्रमाणपत्र त्याखाली जोडले असते तर या एकूणच अशोभनीय कामाचा दर्जा 'शोभनिय' झाला असता.

(२) पत्रासोबत जोडलेल्या डॉ. एन.एच. सहारे यांचे प्रकरणी त्रृटी प्रपत्राच्या अनुक्रमांक २५ वर, "दिनांक ८.१.२००९ रोजी निवडश्रेणीतील वेतन निश्चिती चुकीची आहे" *(पृष्ठ क्र. ७ पहा)* असे नमूद केले आहे. जेव्हा की, श्री सहारे यांची निवड श्रेणीत वेतन निश्चिती खुद्द याच सहसंचालक महोदयांनी अलिकडच्या काळात म्हणजे दिनांक ११.६.२००९ रोजी *(पृष्ठ क्र. ९ पहा)* केलेली आहे. यावरून त्यांची कार्यक्षमता (?) लक्षात घेण्यासारखी आहे. १ जानेवारी २००६ रोजीच्या अस्तित्वीय वित्तलब्धीवर एकदा बिनचूकपणे वेतननिश्चिती केली की, ८ जानेवारी २००९ रोजीच्या वेतननिश्चितीत समजा चूकीने उणे अधिक काही झाले असेल तर त्याचे आपोआपच समायोजन होते, एवढा "कॉमन सेन्स" या कार्यालयातील कोणाकडूनहि वापरला जावू नये हे मोठे आश्चर्य म्हटले पाहिजे. भ्रष्ट हेतु डोळ्यासमोर ठेवून असंबद्ध तृट्या काढण्याचे पेवच त्या कार्यालयात फुटले आहे.

(३) तृटी क्रमांक २७ आपण पाहिल्यास ज्या न्यायालयीन निर्णयात ते स्वतः पार्टी होते तो न्यायालयीन निर्णय त्यांना इतरांनी आणून द्यावा, असे त्यांनी कळविले आहे. शासननिर्णयाप्रमाणे वेतननिश्चिती करतांना ज्या कागदपत्रांची गरज नाही अशी गेल्या २० - २५ वर्षातील कागदपत्रे गोळा करण्याचे शासननिर्णयबाह्य काम त्यांनी सुरु केले असे त्यांच्या त्रृटी पत्राचे वरवर अवलोकन केले तरी आपल्या सहज लक्षात येईल.

८. अनेक बाबतीत कार्यालयातील कारकुनांनी तयार केलेल्या सूचना त्यांनी स्वतःची बुद्धी न वापरता "कार्यालयीन सूचना" म्हणून त्यांच्याच कार्यालयात वापरासाठी दिल्या आहेत व असे करतांना स्वस्तरावर शासन निर्णयाच्या विरोधात काम करण्याचा नियमबाह्य धंदा सुरु ठेवलेला आहे. हे त्यांनी काढलेल्या कार्यालयीन सूचनेच्या संचावरुन दिसून येते. उदाहरण म्हणून त्या सूचनांमधील ***परिच्छेद १२ पहा. त्यात असे म्हटले आहे की,*** **"जे अधिव्याख्याते दिनांक १.१.२००६ रोजी निवडश्रेणीत कार्यरत नव्हते त्यांना रु. ३७४००-६७००० ही वेतनबँड व ग्रेड वेतन रु. ९०००/- देय ठरत नाही"** अशा प्रकारचा नियम केंद्राच्या योजनेत किंवा राज्यशासनाच्या शासन निर्णयात कोठेही नाही. हा त्यांचा आदेश सरळ सरळ शासन निर्णयाची पायमल्ली करणारा आहे व यावरून त्यांनी स्वस्तरावर शासन निर्णय बदलविण्याचे काम हाती घेतल्याचे सुद्धा सिद्ध होते.

(5)

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य,
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ, **अमरावती.** - ४४४ ६०४

क्रमांक : IV / एलसी/
फोन नं. नि. (०७२१) २५३००८०
का.(०७२१) २६६३६४
**दिनांक :** १७.२.२०१०

**प्रति,**
**मा.संचालक (उच्च शिक्षण)** महाराष्ट्र राज्य,पुणे
**मार्फत :** सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :** अमरावती विभागातील उच्च शिक्षण सहसंचालक यांचेकडून शासन निर्णयाचे तसेच वरिष्ठांच्या आदेशांचे वारंवार होत असलेले उल्लंघन.

**संदर्भ :** १) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलसचिवांनी सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांना पाठविलेले पत्र क्रमांक संगाबाअवि/बीसीसी/७७/२०१० दिनांकीत ९ फेब्रुवारी, २०१०

२) डॉ. प्रविण रघुवंशी, सहसचिव, नुटा यांनी मा. संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांना लिहिलेले दिनांक १५.२.२०१० रोजीचे पत्र.

**मा.महोदय,**

संदर्भामध्ये नमूद केलेल्या दोनही पत्रांची मला अग्रेषित केलेली/उपलब्ध झालेली प्रत काळजीपूर्वक पाहिल्यानंतर मला आश्चर्य वाटले. गुरुवार, दिनांक १० डिसेंबर २००९ रोजी नागपूर येथील विधानभवनातील मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या दालनामध्ये (त्याच दिवशी सभागृहात लक्षवेधी सूचनेवर चर्चा होण्यापूर्वी) झालेल्या बैठकीस मी स्वतः हजर होतो. उच्च शिक्षण संचालक या नात्याने आपणही उपस्थित होता. आपण स्वतः संचालक या नात्याने तेथेच उपस्थित असलेल्या अमरावती विभागांच्या सहसंचालकांना **"शिबिरे आयोजित करुन सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीचे काम पार पाडा"** असे आदेश दिले होते. आपल्या समक्ष मा. मंत्रिमहोदयांनी स्वतः स्पष्ट शब्दात त्यांना तसे आदेश दिले. इतकेच नव्हे तर मा. मंत्रिमहोदयांनी त्या दिवशी सभागृहात सुद्धा तसे सांगितले. अशा प्रकारची शिबिरे घेऊन सर्वासमक्ष प्रकरणे निकाली काढल्याने भ्रष्टाचाराला वाव रहात नाही. संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्रांचे वाचन केल्यानंतर अमरावती विभागाच्या सहसंचालकांनी अशी शिबिरे आयोजित केलेली नाहीत हे वाचून आश्चर्य वाटले. वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करण्याचे सहसंचालकांचे हे कृत्य वरिष्ठांप्रति कमालीच्या शिरजोरपणाचे (Gross insubordination) कृत्य आहे असे मला वाटते.

२. दोनही पत्रांचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, शासननिर्णयाप्रमाणे कार्यवाही न करणे, नवीन दुरुस्त्यांचे शासननिर्णय सहसंचालकांनी त्यांच्या स्तरावर त्यांनीच निर्गमित करणे, विद्यापीठाला परस्पर आदेश देण्याचा सहसंचालकांनी केलेला औद्धत्याचा प्रकार, वेतन निश्चितीसाठी शासननिर्णयाप्रमाणे विहित केलेल्या Proforma पेक्षा वेगळ्या Proforma ची फक्त अमरावती विभागासाठी त्यांनी केलेली निर्मिती, सहसंचालकांनी स्वतःच निश्चित करून दिलेली पूर्वीची वेतन निश्चिती त्यांनी स्वतःच्या स्तरावर स्वतःच चुकीची ठरविणे, ३७००-५७०० च्या वेतन श्रेणीत सहाव्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करण्याचे त्यांनी दिलेले विक्षिप्त आदेश, शासन निर्णयामध्ये नमूद नसतांना वेतन पुनर्निश्चितीचा प्रस्ताव विद्यापीठाकडे परत पाठविण्याचा निर्णय त्यांनी स्वस्तरावर घेणे, तसेच शासननिर्णयानुसार व संचालकांनी ठरवून दिलेल्या Proforma नुसार विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीवर पुढे कार्यवाही न करता नवीनच Proforma तयार करण्याचे काम सहसंचालकांनी करणे या सर्व बाबी आश्चर्यकारक असल्या तरी खऱ्या आहेत व त्यामुळेच त्या गंभीरही आहेत.

३. या सर्व बाबींची आपण गांभीर्याने नोंद घेवून ताबडतोबीने उपाययोजना करावी अशी माझी आपणास विनंती आहे. यथोचित कारवाई बद्दल व पत्रोत्तराबद्दल मी आपला आभारी होईल.

आपला विनित

**(बी.टी.देशमुख)**

*विधानपरिषद सदस्य*

** AF:P 11 **

९. सह संचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्‍चिती संदर्भात पत्र क्रमांक ससं/उशि/लले/१०/४९७ दि. ८.१०.२०१० ला सर्व प्राचार्यांना पाठविले आहे. ***(सहपत्र ६)*** या पत्रासोबत Proforma A जोडला असून त्यामध्ये तृटी असलेल्या संबंधित शिक्षकांची माहिती भरून देण्याची सूचना प्राचार्यांना सहसंचालकांनी केलेली आहे. या Proforma चे अवलोकन केल्यास तो १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाचा भाग नाही हे स्पष्ट होते. सहसंचालकांनी शासननिर्णयाचा भाग नसलेला एक नवीनच Proforma अमरावती विभागातील प्राचार्यांना आपल्या स्तरावर तयार करून पाठविला आहे. हे सरळ सरळ दि. १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट दिसून येते. अशा प्रकारे शासननिर्णयाच्या तरतुदींचे उल्लंघन करुन स्वस्तरावर पोरकटपणे निर्णय घेण्याचा प्रताप हा केवळ महाराष्ट्रात अमरावती विभागाच्या सहसंचालकांनीच केला आहे हे या माध्यमातून आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

१०. वरिष्ठांना नेहमी चुकीची माहिती देण्यात या सहसंचालकांचा हातखंडा असून त्यांनी दिलेल्या (चुकीच्या) माहितीच्या आधारावर सन २००९ च्या विधानपरिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात (नागपूर अधिवेशन, दि. १० डिसेंबर २००९) मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनात **परिच्छेद क्र. २** मधील दुसऱ्या ओळीमध्ये **"या समितीमध्ये सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती यांनी कोणत्याही व्यक्तिची नावे सूचविलेली नाहीत,"** असा उल्लेख होता. हा उल्लेख सहसंचालकांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारावरच त्या निवदेनामध्ये आला होता हे उघडच आहे. सभागृहात येतांना सहसंचालकांनी पुरविलेली माहिती पूर्णपणे असत्य आहे हे लक्षात आल्याने सभागृहात सुरुवातीलाच **"हे वाक्य वगळण्यात यावे"**. असे मा.उच्च शिक्षण मंत्र्यांना सांगावे लागले.

११. चवथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी वेतन निश्‍चितीचे काम शिबीरे घेऊन करण्यात आले होते व यावेळी सुद्धा ही परंपरा कायम ठेवण्यात येईल असे आश्वासन मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी विधान परिषदेत दिले असतांना **सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्‍चितीसाठी या सहसंचालकांनी शिबीरे घेण्याचे हेतुपुरस्पर टाळलेले आहे याचे मुख्य कारण म्हणजे शिबीरे घेऊन तिथल्या तिथे प्रकरणे निकाली काढण्याच्या प्रक्रियेत भ्रष्टाचाराला वाव राहत नाही.** शिवाय कोणकोणती कागदपत्रे घेऊन प्राचार्यांनी आले पाहिजे याची यादी द्यावी लागते. कारकुनी पद्धतीने एक, एक, नवा, नवा कागद मागण्याची सुविधा रहात नाही. सहाव्या वेतन आयोगातील वेतन निश्‍चितीचे काम सुद्धा शिबीरे लावून करण्याचे अपेक्षित असतांना व तसे मा.उच्च शिक्षण मंत्र्यांनी घोषित केलेले असतांना सुद्धा त्याची अंमलबजावणी करण्याची आठवण या सहसंचालकांना असू नये ही त्यांची कृति सरळ सरळ वरिष्ठांच्या आदेशांचे उल्लंघन करणारी आहे.

(6)

## *कार्यालय, सहसंचालक (उच्च शिक्षण)*

## अमरावती विभाग, अमरावती-४४४ ६०४

***क्रमांक ससं/उशि/लले/१०/५९३***

***दिनांक १७.२.२०१०***

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय कला , वाणिज्य, विधी व अध्यापक महाविद्यालये अमरावती विभाग, अमरावती.

**विषय** :- सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्‍चितीमधील त्रुटींची पूर्तता करण्याकरिता शिबिर.

संदर्भ :- या कार्यालयाची पत्रे,

(१) ससं/उशि/लले/१०/४९७ दिनांक ०८.२.२०१०

(२) ससं/उशि/लले/१०/५३६ दिनांक १०.२.२०१०

(३) सहावा वेतन आयोगाची प्राचार्यांना पाठविलेली तृटीपत्रे.

कृपया संदर्भाधिन पत्रांचे अवलोकन करावे. **सदर पत्र व त्यासोबत देण्यात आलेली प्रपत्रे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.**

सहसंचालक, उच्च शिक्षण
अमरावती विभाग, अमरावती.

** AF:P 13 **

**विनंती** - १) शासन निर्णयातील तरतुदींप्रमाणे सही शिक्क्यानिशी सक्षम अधिकाऱ्यांनी मान्य केलेली व वर्षानुवर्षे शिक्षकाला मिळत असलेली दि.१ जानेवारी, २००६ रोजीची अस्तित्वातील वित्तलब्धी विचारात घेऊन त्या वित्तलब्धीच्या आधारावर विद्यापीठाने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्‍चितीची प्रक्रिया संगणकप्रणालीद्वारे बिनचूकपणे पार पाडली आहे. विद्यापीठाने करून दिलेल्या त्या प्रक्रियेनुसार सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती विभाग यांनी सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्‍चिती पार पाडावी असे सक्त आदेश त्यांना देण्यात यावे. असे करतांना विद्यापीठाने निश्‍चित करुन दिलेली वेतन निश्‍चिती - **(१) विद्यापीठाने प्रमाणित केल्याप्रमाणे जशीच्या तशी त्यांनी मान्य करावी, किंवा (२) ती कारणे देऊन अमान्य करावी, किंवा (३) ती कारणे देऊन दुरूस्त करून मान्य करावी.** शासन निर्णयामध्ये त्यांनी यापेक्षा काही वेगळे करावे असे अपेक्षित नाही. शासननिर्णयाप्रमाणे अमरावती विभाग सोडल्यास सर्व महाराष्ट्रभर अशीच ही प्रक्रिया पार पडलेली आहे. **त्यांना जे काय करावयाचे असेल त्या दुरुस्त्या त्यांनी कराव्या पण शासनाने ठरवून दिलेल्या मुदतीत त्यांनी त्यांचे काम पूर्ण करावे असे सक्त आदेश त्यांना देण्यात यावेत.**

२) तसेच या बाबतीत त्यांचेकडून (सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती) किंवा त्यांच्या कार्यालयाकडून भ्रष्टाचाराच्या हेतूने किंवा अन्य कारणाने अकारण किंवा सकारण दिनांक १.१.२००६ पूर्वी काही चुक झालेली असल्यास ती दुरुस्त करायला कोणाचीही कोणतीही हरकत असण्याचे कारण नाही. ती स्वतंत्र प्रक्रिया आहे. त्याचा संबंध सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्‍चितीशी जोडणे हे स्वतःच्या व स्वतःच्या कार्यालयाच्या जुन्या भ्रष्टाचारावर पांघरुण घालण्यासाठी नव्या भ्रष्टाचाराची संधी देण्याची मागणी करण्यासारखे होईल. त्यांच्या खरोखरच चुका झाल्या असल्यास वरिष्ठांमार्फत चौकशी करुन त्यांच्यावर किंवा त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर चुकीची जबाबदारी निश्‍चित करण्यात यावी. ज्या कोणाला जादा काही दिले असेल त्याला कारणे दाखविण्याची सूचना देवून त्याचे म्हणणे ऐकून घेऊनच पदस्थ सहसंचालकापेक्षा वेगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी १ जानेवारी २००६ पूर्वीच्या कापाकापीबाबत निर्णय घ्यावा.

३) हा सारा गोंधळ एकट्या अमरावती विभागातच चालू आहे हे लक्षात घेता अशाप्रकारे अत्यंत बेजबाबदारपणे वर्तन करून शासन निर्णयाचे सतत उल्लंघन व वरिष्ठांच्या आदेशांची सतत अवहेलना करणाऱ्या अमरावती विभागीय सहसंचालकांच्या या वर्तनाबद्दल योग्य ती चौकशी करुन कारवाई करावी त्याच बरोबर शासन निर्णय निट वाचून हे काम करण्याची त्यांची इच्छा नसल्यास किंवा त्यांची क्षमता नसल्यास वेतन निश्‍चितीच्या कामासाठी आपण वेगळी व्यवस्था करावी अशी आपणास विनंती आहे.

आपला विनित,
**( डॉ. प्रविण रघुवंशी )**
सहसचिव 'नुटा'

**सहपत्र** - क्रमांक १ ते ६ जोडलेले आहेत

**प्रतिलिपी** -१. प्रा. बी.टी.देशमुख, विधान परिषद सदस्य, अमरावती विभाग, अमरावती

** FS:P 55 **

(7)

## *कार्यालय, सहसंचालक (उच्च शिक्षण)*

## अमरावती विभाग, अमरावती-४४४ ६०४

***क्रमांक ससं/उशि/लले/१०/५९२ दिनांक १७.२.२०१०***

प्रति,

कुलसचिव,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती

विषय :- विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू झालेल्या वेतन आयोगाच्या वेतन निश्‍चितीचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्रमांक ससं/उशि/लले/१०/३२३, दिनांक २७.१.२०१०.

कृपया संदर्भाधीन पत्राचे अवलोकन करावे. **सदर पत्र याद्वारे रद्द करण्यात येत आहे.**

सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग, अमरावती.

** AF:P 15 **

(1)

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

*(B.P.T.A. Regn. No. F-1564 & Soc. Regn. Act) [Regn. No. MAH/15/73 (NAG)*

**From : Dr. E. H. Kathale,** Secretary, NUTA, N-162, Reshimbag, Nagpur-09, Ph. No. : (0712) 2741098

***क्रमांक : नुटा/१/एस/२०१० : दिनांक : ४ जानेवारी, २०१०***

प्रति,

कुलसचिव,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर-४४०००१

**विषयः** विद्यापीठ व महाविद्यालयांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीच्या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ क्षेत्रातील कामाचा आढावा संघटनेस प्राप्त होण्याबाबत.

**संदर्भः** वरील विषयाच्या संदर्भातील महाराष्ट्र शासनाने दिनांक १२ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय.

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीचे काम दिनांक १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे त्या-त्या विभागातील विद्यापीठांकडे व सहसंचालकांकडे सोपविण्यात आलेले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने वेतन निश्चितीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी निश्चित कार्यक्रम ठरविला आहे. सहसंचालक(उ.शि.) नागपूर विभाग यांनीसुध्दा त्यांचे स्तरावर वेतन निश्चितीच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी आधीच कार्यक्रम जाहीर केलेला आहे. विद्यापीठाने महाविद्यालयांना दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे महाविद्यालयनिहाय वेतन निश्चितीचे प्रस्ताव निकाली काढून सहसंचालकांच्या कार्यालयामध्ये एकूण किती प्रस्ताव पाठविण्यात आले याची माहिती नुटा संघटनेला देण्यात यावी. तसेच विद्यापीठाने किती महाविद्यालयांची प्रकरणे कार्यक्रमानुसार निकाल काढलीत व कोणत्या तारखांना सहसंचालकांच्या कार्यालयात पाठविण्यात आलीत, या संदर्भात तपशीलवार माहिती त्वरित देण्यात यावी, ही विनंती.

धन्यवाद!

आपला विनीत,<br>
(डॉ. एकनाथ कठाळे)<br>
सचिव, नुटा

प्रतिलिपी माहितीकरिता सविनय सादर, मा. प्रा. बी. टी. देशमुख, विधान परिषद सदस्य, अमरावती

*** FS:P 63 ***

(2)

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

*(B.P.T.A. Regn. No. F-1564 & Soc. Regn. Act) [Regn. No. MAH/15/73 (NAG)*

**From : Dr. E. H. Kathale,** Secretary, NUTA, N-162, Reshimbag, Nagpur-09, Ph. No. : (0712) 2741098

***क्रमांक २/एस/१० : दिनांक ११.१.२०१०***

प्रति,

**सहसंचालक** (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर

**विषय :** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीची प्रकरणे -

**संदर्भ :** १) उपरोक्त विषयासंदर्भात १२ ऑगष्ट २००९ रोजी प्रसृत शासन निर्णय.

२) वरील शासन निर्णयात दुरूस्त्या करण्यासंदर्भात दि. १९/११/२००९ रोजी प्रसृत शासन निर्णय.

महोदय,

महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या व केंद्राने मान्य केलेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करण्याचे संदर्भात दि. १२ ऑगष्ट, २००९ रोजी शासन निर्णय प्रसृत करण्यात आला. त्यामध्ये दि. २६ ऑगष्ट रोजी महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेबरोबर झालेल्या चर्चेप्रमाणे दि. १९ नोव्हेंबर, २००९ रोजी काही दुरूस्त्या करणारा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. उपरोक्त संदर्भातील १२ ऑगष्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची वेतन श्रेणी सुधारण्याचे प्रस्ताव विद्यापीठाने तयार करून व प्रमाणपत्र जोडून सहसंचालकाकडे सादर करणे आवश्यक आहे.

महोदय, वेतन निश्चितीचे संदर्भात होत असलेली दिरंगाई लक्षात घेऊन आ. प्रा. बी. टी. देशमुख यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा. उच्च शिक्षण मंत्री यांनी दि. १० डिसेंबर २००९ रोजी विधान परिषदेत निवेदन सादर केले. त्यावर झालेल्या चर्चेमध्ये "सर्व विद्यापीठांच्या संबंधित सेक्शनने १५ दिवसाच्या आत पे फिक्सेशनचे प्रस्ताव सहसंचालकाकडे पाठविले पाहिजेत हे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात येईल " असे आश्वासन दिले. रा.तु.म. नागपुर विद्यापीठाकडून आवश्यक प्रमाणपत्रासह प्रस्ताव आपल्या कार्यालयाकडे कोणकोणत्या तारखांना प्राप्त झालेत व आपल्या स्तरावर त्यावर काय कार्यवाही करण्यात आली या संबंधीची तपशीलवार माहिती संघटनेला उपलब्ध करून द्यावी अशी मी आपणास या निवेदनाद्वारे विनंती करीत आहे.

धन्यवाद!

आपला विश्वासू,<br>
(एकनाथ कठाळे)<br>
सचिव, नुटा

पत्राची प्रत समादराने माहितीसाठी सादर :- प्रा. बी. टी. देशमुख, अध्यक्ष, नुटा, अमरावती.

*** FS:P 65 ***

(3)

# कार्यालय-सहसंचालक उच्चशिक्षण, नागपूर विभाग नागपूर.

*क्र. उशिनाग/वेतननिश्चिती/२४९/१०*

**दिनांक : १३/१/२०१०**

प्रति,

श्री. एकनाथ कठाळे

सचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ, एन-१६२, रेशीमबाग, नागपूर.

**विषय** -विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीची प्रकरणे.

**संदर्भ** - आपले पत्र क्र. २/एस/१० दिनांक ११/१/१०

वरिल विषयाचे संदर्भिय पत्रात नमूद केल्यानूसार या विभागातील महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीची प्रकरणे प्रमाणित करून या कार्यालयास सादर केलेली असून या कार्यालयास प्राप्त प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहे. त्याचा तपशील सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सहपत्र - वरिलप्रमाणे

**(डॉ. अजित देशमुख)**

सहसंचालक उच्चशिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

**टीप :** दिनांक १२/१/२०१० पर्यन्त शिक्षकांव्यतिरिक्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची एकूण १६३३ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.

## *६ व्या वेतन आयोग शिक्षकांची निकाली काढण्यात आलेली प्रकरणे*

सुरुवातीला अ.नं. त्यानंतर महाविद्यालयाचे नाव दिले असून त्यापुढे प्रकरणांची प्राप्त संख्या (शिक्षक) दिली असून त्यानंतर कंसात (प्रकरणे प्राप्त झाल्याचा दिनांक) दिलेला आहे व शेवटी कार्यवाही दिनांक दिलेला आहे.

१. डी.बी.सायन्स कॉलेज, गोंदिया १५ (११.१२.०९) ११.१२.०९
२. एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया १२ (११.१२.०९) ११.१२.०९
३. एन.एम.डी.कॉलेज, गोंदिया १९ (१२.१२.०९) १२.१२.०९
४. सी.जे. पटेल कॉलेज, तिरोडा ०८ (१२.१२.०९) १२.१२.०९
५. एम.बी.पटेल कॉलेज, देवरी ०८ (१४.१२.०९) १४.१२.०९
६. जनता महाविद्यालय, चंद्रपूर ३६ (१५.१२.०९) १५.१२.०९
७. जनता शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर ०८ (१५.१२.०९) १५.१२.०९
८. एन.एच.महाविद्यालय, ब्रम्हपूरी ३७ (१५.१२.०९) १५.१२.०९
९. एस.एस.जयस्वाल कॉलेज, अर्जुनी १८ (१५.१२.०९) १५.१२.०९
१०. ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव १५ (१६.१२.०९) १६.१२.०९
११. कर्मवीर महाविद्यालय, मूल ०६ (१६.१२.०९) १६.१२.०९
१२. एस.एन.टी. महाविद्यालय, रामटेक ०५ (१६.१२.०९) १६.१२.०९
१३. संत गाडगे महाराज महाविद्यालय, हिंगणा १४ (१६.१२.०९) १६.१२.०९
१४. डॉ. आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी ०८ (१७.१२.०९) १७.१२.०९
१५. म. ज्योतीबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर ०६ (१७.१२.०९) १७.१२.०९
१६. नबीरा महाविद्यालय, काटोल २५ (१७.१२.०९) १७.१२.०९
१७. एस.एन.मोर कॉलेज, तूमसर २७ (१८.१२.०९) १८.१२.०९
१८. पी.पी.शिक्षण महाविद्यालय, गोंदिया ०९ (१८.१२.०९) १८.१२.०९
१९. बॅ.शे.वानखेडे महाविद्यालय, मोहपा ०७ (१९.१२.०९) १९.१२.०९
२०. महात्मा गांधी महाविद्यालय, पारशिवणी ०९ (१९.१२.०९) १९.१२.०९
२१. विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती १४ (१९.१२.०९) १९.१२.०९
२२. कला वाणिज्य महाविद्यालय, तूकूम २४ (१९.१२.०९) १९.१२.०९
२३. अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय, भारसिंगी ०८ (१९.१२.०९) १९.१२.०९
२४. एस.पी.विधी महाविद्यालय, चंद्रपूर १५ (२१.१२.०९) २१.१२.०९
२५. राष्ट्रपिता म. गांधी महाविद्यालय, सावली ०८ (२१.१२.०९) २१.१२.०९
२६. शरद पवार महाविद्यालय, गडचांदूर ०७ (२१.१२.०९) २१.१२.०९
२७. कला वाणिज्य विज्ञान महा. कोराडी २५ (२१.१२.०९) २१.१२.०९
२८. या. पोशेट्टीवार महाविद्यालय, तळोदी बा. ०३ (२२.१२.०९) २२.१२.०९
२९. कला वाणिज्य महाविद्यालय, भिसी ०५ (२२.१२.०९) २२.१२.०९
३०. लोकमान्य महाविद्यालय, वरोरा ०८ (२२.१२.०९) २२.१२.०९
३१. गोविंदप्रभू महाविद्यालय, तळोदी बाळापूर ०३ (२२.१२.०९) २२.१२.०९
३२. धरमपेठ कला वाणिज्य महा., नागपूर २० (२२.१२.०९) २२.१२.०९
३३. एल.ए.डी. महविद्यालय., नागपूर ७६ (२३.१२.०९) २३.१२.०९
३४. मोहता विज्ञान महविद्यालय., नागपूर ३७ (२४.१२.०९) २४.१२.०९
३५. धनवटे नॅशनल महविद्यालय., नागपूर ३३ (२४.१२.०९) २४.१२.०९
३६. एच.बी.टी. कॉलेज, नागपूर १० (२६.१२.०९) २६.१२.०९
३७. के.झेड, एस. महा., ब्राम्हणी १० (२६.१२.०९) २६.१२.०९
३८. बॅ. वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा ११ (२९.१२.०९) २९.१२.०९
३९. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर २६ (२९.१२.०९) २९.१२.०९
४०. अ. गुंडेवार महाविद्यालय, नागपूर १८ (३०.१२.०९) ३०.१२.०९
४१. प्रगती महिला महाविद्यालय, भंडारा ०७ (३०.१२.०९) ३०.१२.०९
४२. शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली ०८ (३०.१२.०९) ३०.१२.०९
४३. दयानंद कन्या महाविद्यालय, नागपूर १३ (३१.१२.०९) ३१.१२.०९
४४. सिंधू महाविद्यालय, नागपूर २५ (३१.१२.०९) ३१.१२.०९
४५. महिला महाविद्यालय, नागपूर १४ (३१.१२.०९) ३१.१२.०९
४६. वुमेन्स कॉलेज, नागपूर १५ (१.१.१०) १.१.१०
४७. धरमपेठ विज्ञान महा. नागपूर २० (२.१.१०) २.१.१०
४८. यशोदा महिला महा. नागपूर १३ (४.१.१०) ४.१.१०
४९. जवाहर नेहरू महा. वाडी नागपूर २८ (४.१.१०) ४.१.१०
५०. रा. केवलरामानी महा. नागपूर ०७ (५.१.१०) ५.१.१०
५१. सेवादल महिला महा. नागपूर ४६ (६.१.१०) ६.१.१०
५२. पं देशमुख रात्र महा. नागपूर १३ (६.१.१०) ६.१.१०
५३. विद्याभारती महा. कुरखेडा १० (७.१.१०) ७.१.१०
५४. आदर्श कला महा. देसाईगंज १० (७.१.१०) ७.१.१०
५५. मातृसेवा संघ महा. नागपूर १२ (८.१.१०) ८.१.१०
५६. वनश्री कला महा. कोरची ०८ (८.१.१०) ८.१.१०
५७. स्वावलंबी शिक्षण महा. वर्धा ०६ (११.१.१०) ११.१.१०
५८. यशवंत महाविद्यालय, वर्धा ४३ (११.१.१०) ११.१.१०
५९. जी. एस. वाणिज्य महा. वर्धा ०८ (११.१.१०) ११.१.१०
६०. हिस्लॉप कॉलेज, नागपूर ४५ (११.१.१०) ११.१.१०
६१. लोक महाविद्यालय, वर्धा १६ (१२.१.१०) १२.१.१०
६२. अरूणराव कलोडे महाविद्यालय, नागपूर ११ (१२.१.१०) १२.१.१०
६३. झोटींग महाविद्यालय, समुद्रपूर ०८ (१२.१.१०) १२.१.१०

** FS:P 67 **

(4)

# *उच्च शिक्षण सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर - ४४० ००१*

तात्काळ

**जावक क्रमांक वेनि ११५६ : दिनांक : २३.२.१०**

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अ.शा. अनुदानित महाविद्यालये, नागपूर विभाग,

**विषय :-** ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती व वेतन देयके सादर करण्याबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र दिनांक १९.९.०९, २२.९.०९, १०.१०.०९, २१.१२.०९, ९.२.१०, १०.२.१०, १५.२.१०, १८.२.१० व २२.२.१०.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र पहावे.

वरील संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयाद्वारे आपल्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करण्याबाबत कळविण्यात आले होते. आज दिनांकापर्यंत १२५ महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती झालेली आहे. त्यापैकी फक्त ८० महाविद्यालयांनीच माहे फेब्रुवारी १० चे वेतन देयक ६ व्या वेतन आयोगानुसार सादर केले, त्यामुळे फेब्रुवारी १० चे मासिक वेतन तयार करण्यास अडचण निर्माण झाली आहे. तेव्हा सर्व महाविद्यालयांनी दिनांक २.३.१० पर्यंत वेतन निश्चिती करुन माहे फेब्रुवारी १० चे वेतन देयक ६ व्या वेतनानुसार सादर करावे. सदर कामास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन देयक पाठविले असल्यास ते रद्द करुन ६ व्या वेतन आयोगानुसारच देयक सादर करावे.

सहसंचालक, उच्च शिक्षण

नागपूर विभाग, नागपूर

**प्रतिलीपी :** (१) कुलसचिव, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे कार्यवाहीस्तव (२) कुलसचिव, कवि कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक (३) श्री. एकनाथ कठाळे, सचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ, रेशिम बाग, नागपूर.

** AF:P 17 **

*मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांनी स्थावर व जंगम मालमत्तेबाबतचे विवरणपत्र सादर करण्याबाबत.*

# महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण ज्ञ् २००९/(३१८/०९)/विशि - ३, : मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**

दिनांक :- २० फेब्रुवारी, २०१०

**प्रस्तावना :** देशाची प्रगती होण्यासाठी तसेच जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी नागरिकांस दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. भविष्यातील सुज्ञ नागरिक घडविण्यामध्ये उच्च शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार राज्यातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याची सर्व जबाबदारी विद्यापीठाचे कुलगुरु व त्यांचे सर्व अधिकारी यांची असते. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, इत्यादी प्राधिकरणांकडून सुध्दा वेळोवेळी निर्देश देण्यात येतात.

२. तथापि गेल्या काही वर्षापासून असे निदर्शनास आले आहे की एका बाजुला जागतिक स्तरावर उच्च शिक्षणाचा दर्जा वाढत असून दुस-या बाजुला राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा मात्र घसरत आहे. याबाबत समाजातील विविध घटक व तज्ञांकडून व तसेच मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखालील कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) वेळोवेळी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संदर्भात मा.न्यायालयानेही वेगवेगळया याचिकांमध्ये निर्णय देतांना चिंता व्यक्त केली आहे.

३. मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुलगुरुंच्या बैठकीत (J.B.V.C.) व मा. उच्च न्यायालयाने निरनिराळया याचिकांमध्ये निर्णय देतांना उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व शिक्षणाच्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत राज्यातील विद्यार्थी टिकून राहावेत यासाठी योग्य ती पावले उचलण्यासाठी शासनाला व विद्यापीठांना आदेशित केलेले आहे.

४. शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षेप्रमाणे वाढ न होण्याची व शिक्षण क्षेत्रामध्ये घसरण होण्याच्या अनेक कारणांपैकी राज्यातील अध्यापक अपेक्षेप्रमाणे शिकविण्याचे काम करीत नसल्याचे, त्याचप्रमाणे आवश्यक ते संशोधन करीत नसल्याचे आणि वर्गात शिकविण्यापेक्षा खाजगी शिकवणी घेणे, इत्यादी बाबींकडे त्यांचा जास्त कस असणे ही प्रमुख कारणे प्रकर्षाने दिसून आलेली आहेत. याबाबतीत मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यानी याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दि. ३.१२.२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेतः-

"8 (c) The State Government as well as the University should consider some disciplinary measures in respect of the teaching faculty in the Government run as well as Government aided Colleges/Institutes all over the State of Maharashtra so as to ensure that they devote their full time for education, research, training, art and literature and that they do not engage themselves in any other vocation or source of earning while in service. Some steps in this regard which may be considered could be on par with the Government employees like submission of the details of movable / improvable properties every year and to submit a written undertaking while joining the services that he/she will devote full time for teaching, training, research, literature and art and will not engage in any other business / source of income. These are only some of the examples and it is for the State Government as well as the University to formulate such measures to ensure that the highest academic standards are maintained by these institutes as public money is spent to run these institutes."

५. मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) व त्याचप्रमाणे शासन स्तरावरुन घेण्यात आलेल्या बैठकांमधून कुलगुरु, कुलसचिव, प्राचार्य इत्यादींना वेळोवेळी अवगत करुन त्याचप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश वेळोवेळी देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सर्व विद्यापीठांकडून याबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाली असल्याचे अपेक्षित आहे.

६. मा. उच्च न्यायालयाचे वरील निर्णय विचारात घेऊन शासन स्तरावरुन आवश्यक ते आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शासकीय व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील अध्यापकांनी स्थावर व जंगम मालमत्तेबाबतचे विवरणपत्र आणि लिखित सहमती पत्र सादर करणेबाबत याद्वारे शासन पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशातील इतर बाबींवर स्वतंत्ररीत्या आदेश निर्गमित करण्यात येतील.

शासन निर्णय

**७. अकृषि विद्यापीठे व शासकीय व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील अध्यापकांनी स्थावर व जंगम मालमत्तेबाबतचे विवरणपत्र आणि लिखित सहमती पत्र देणे-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सर्व अध्यापकांनी शासकीय कर्मचा-यांप्रमाणे खालील बाबी सक्षम प्राधिका-याकडे सादर करणे अनिवार्य करण्यात येत आहेः-

i) स्थावर व जंगम मालमत्ता याबाबतचे विवरणपत्र दरवर्षी सादर करणे.

ii) लिखित सहमतीपत्र (written undertaking) सादर करणे.

८. स्थावर जंगम मालमत्तेचे विवरणपत्र सादर करणे.

i) राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी विनिर्दीष्ट केलेली कार्यपद्ध्दती अनुसरुन शासकीय कर्मचा-यांसाठी विहित केलेल्या नमुन्यातच स्थावर व जंगम मालमत्ता याबाबतचे विवरणपत्र सादर करावे.

ii) प्रत्येक वर्षाच्या दि. ३१ डिसेंबर रोजी असणा-या स्थावर व जंगम मालमत्तेचे विवरणपत्र (सिलबंद लखोटयामध्ये) विहित नमुन्यात सर्व अध्यापकांनी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे वर्षाच्या दि. १० जानेवारी पर्यंत सादर करावेत.

iii) तथापी, डिसेंबर, २००९ अखेरपर्यंत विवरणपत्र दिनांक २८ फेब्रुवारी, २०१० पर्यंत संबंधित सक्षम प्राधिका-यांकडे सादर करावीत.

**८.१ शासकीय महाविद्यालय/संस्थांसाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी-**

i) शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्थेचे संचालक यांनी त्यांचेकडे कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकाचे विवरणपत्र (सिलबंद लखोटयामध्ये) १० जानेवारीपर्यंत प्राप्त करुन घ्यावेत व ते सर्व विवरणपत्र गोषवा-यासह संबंधीत विभागीय सहसंचालकांमार्फत संचालक, उच्च शिक्षण यांचेकडे दि. १५ जानेवारी पर्यंत पाठवावेत.

ii) तथापी, डिसेंबर, २००९ अखेरपर्यंत विवरणपत्र दिनांक २८ फेब्रुवारी, २०१० पर्यंत संबंधित सक्षम प्राधिका-याकडे सादर करावीत.

iii) शासकीय महाविद्यालये/संस्थामधील अध्यापकाकडून प्राप्त झालेले सर्व सिलबंद लखोटे व्यवस्थितपणे, सुस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयाकडे जतन करुन ठेवावेत.

**८.२ विद्यापीठ व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी-**

i) अशासकीय अनुदानीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचेकडे कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकाचे विवरणपत्र (सिलबंद लखोटयामध्ये) १० जानेवारीपर्यंत प्राप्त करुन घ्यावेत व ते सर्व विवरणपत्र गोषवा-यासह संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु याचेकडे दि. १५ जानेवारी पर्यंत पाठवावेत.

ii) विद्यापीठातील सर्व अध्यापकांनी अशी विवरणपत्रे (सिलबंद लखोटयामध्ये) कुलगुरु यांच्याकडे दि.१० जानेवारी पर्यंत सादर करावीत.

iii) विद्यापीठाच्या कुलगुरुनी खुद्द विद्यापीठातील व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयामधील अध्यापकाकडून प्राप्त झालेले सर्व सिलबंद लखोटे व्यवस्थितपणे, सुस्थितीत विद्यापीठाकडेच जतन करुन ठेवावेत.

iv) विद्यापीठाच्या कुलगुरुंनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या मालमत्ता विवरणपत्राचा महाविद्यालयनिहाय सांख्यिकी गोषवारा संचालक, उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण यांचेकडे फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात पाठवावा. त्यामध्ये केवळ किती अध्यापकांनी विवरणपत्र सादर केले, किती अध्यापकांनी विवरणपत्र सादर केले नाही याबाबतच्या माहितीचा समावेश करावा. तसेच ज्या अध्यापकांनी अशा स्वरुपाचे विवरणपत्र विहीत मुदतीत सादर केले नसेल त्यांची नावे संचालकांना कळवावीत.

v) अध्यापकांकडून प्राप्त झालेली अशा सिलबंद लखोटयातील माहिती गुप्त ठेवण्यात यावी. तथापी, संबंधीतांच्या विरुध्द विभागीय चौकशी, इ. बाबत अशी विवरणपत्रे तपासणे आवश्यक असल्यास प्रकरणपरत्वे मागणीनुसार संबंधीत प्राधिकरणास सादर करावीत.

**९. लेखी सहमती पत्र (written undertaking) सादर करणे** -

i) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सर्व अध्यापकांनी खालील आशयाचे लेखी सहमतीपत्र सक्षम प्राधिका-याकडे सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत दोन प्रतीत सादर करावे.

'He/She will devote his / her full time for education, research, training, art and literature and that will not engage him/herself in any other vocation or source of earning while in service.'

**९.१ शासकीय महाविद्यालय/संस्थांसाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी-**

i) शासकीय महाविद्यालय/संस्था मधील सर्व अध्यापकांनी सहमतीपत्र संबंधीत प्राचार्य/संचालक यांचेकडे द्यावे व प्राचार्य/संचालक यांनी त्यावर प्रतिस्वाक्षरी (Counter signature) करावी.

ii) प्राचार्य/संचालक यांनी सर्व अध्यापकांच्या अशा सहमतीपत्राची एक प्रत सांख्यिकी गोषवा-यासह संबंधित विभागीय सहसंचालकांमार्फत संचालक, उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण यांचेकडे तात्काळ सादर करावी व एक प्रत महाविद्यालयात जतन करुन ठेवावी.

iii) शासकीय महाविद्यालय/संस्थामधील सर्व अध्यापकांची सहमतीपत्रे सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत प्राप्त करुन घेण्यावी संपूर्ण जबाबदारी संबंधीत विभागीय सहसंचालक व संचालक, उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण यांची राहील.

iv) संचालक, उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण यांचेकडे प्राप्त झालेली सर्व सहमतीपत्रे व्यवस्थितपणे, सुस्थितीत संचालनालयात जतन करुन ठेवावीत.

९.२ विद्यापीठ व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी-

i) अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील सर्व अध्यापकांनी सहमतीपत्र संबंधीत प्राचार्याकडे द्यावे. प्राचार्यानी त्यावर प्रतिस्वाक्षरी (Counter signature) करावी.

ii) प्राचार्यांनी सर्व अध्यापकांच्या अशा सहमतीपत्राची एक प्रत सांखिकी गोषवा-यासह संबंधित विद्यापीठाच्या कुलगुरुंकडे तात्काळ सादर करावी व एक प्रत महाविद्यालयात जतन करुन ठेवावी.

iii) विद्यापीठातील सर्व अध्यापकांनी वरीलप्रमाणे लिखित सहमतीपत्र (written undertaking) विद्यापीठाच्या कुलगुरुंकडे सादर करावे.

iv) सर्व महाविद्यालये व विद्यापीठामध्ये नव्याने नियुक्त होणा-या अधिव्याख्यात्यांनीसुध्दा वरीलप्रमाणे लिखित सहमतीपत्र (written undertaking) नियुक्तीच्या वेळी सादर करावे.

v) विद्यापीठातील तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सर्व अध्यापकांची सहमतीपत्रे सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विद्यापीठाच्या कुलगुरुंची राहील.

vi) विद्यापीठाच्या कुलगुरुंनी प्राप्त झालेली सर्व सहमतीपत्रे व्यवस्थितपणे, सुस्थितीत विद्यापीठाकडेच जतन करुन ठेवावीत.

viii) विद्यापीठाच्या कुलगुरुंनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सहमतीपत्राचा सांख्यिकी गोषवारा संचालक, उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण यांचेकडे त्वरीत पाठवावा. त्यामध्ये किती अध्यापकांनी सहमतीपत्र सादर केली, किती अध्यापकांनी सहमतीपत्र सादर केली नाहीत. याबाबतच्या माहितीचा समावेश करावा. तसेच ज्या अध्यापकांनी अशा स्वरुपाचे सहमतीपत्रे विहीत मुदतीत सादर केली नसतील त्याची नावे संचालकांना विनाविलंब कळवावीत.

**१०.१ शासकीय महाविद्यालय/संस्थांनी वरीलप्रमाणे विवरणपत्रे व सहमती पत्र सादर न केल्यास करावयाची कार्यवाही-**

i) सदर कार्यवाहीमध्ये जी महाविद्यालये/संस्था त्याचप्रमाणे अधिव्याख्याते टाळाटाळ करतील किंवा हेतुपुरस्सर दुर्लक्ष करतील त्याचेविरुध्द संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व संचालक, उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण यांनी शिस्तभंगाची कारवाई करावी.

ii) सर्व अध्यापकांची लिखित सहमतीपत्राप्रमाणे (written undertaking) वर्तणुक आहे किंवा कसे यांची वेळोवेळी तपासणी करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत प्राचार्य / संस्थांचे संचालक, विभागीय सहसंचालक व संचालक, उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण यांची राहील.

iii) अध्यापक लिखित सहमतीपत्राच्या (written undertaking) विरुध्द वर्तणूक करीत असल्याचे दिसून आल्यास त्यांच्या विरुध्द संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य / संस्थाचे संचालक व संचालक, उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण यांनी कारवाई करावी.

१०.२ विद्यापीठ व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयांनी वरीलप्रमाणे विवरणपत्रे व सहमती पत्र सादर न केल्यास कारावयाची कार्यवाही -

i) सदर कार्यवाहीमध्ये जी अशासकीय अनुदानीत महाविद्यालये व अधिव्याख्याते टाळाटाळ करतील किंवा हेतुपुरस्सर दुर्लक्ष करतील त्यांचेविरुध्द संबंधित महाविद्यालयाने व विद्यापीठाने शिस्तभंगाची कारवाई करावी.

ii) सर्व अध्यापकांची लिखित सहमतीपत्राप्रमाणे (written undertaking) वर्तणूक आहे किंवा कसे यांची वेळोवळी तपासणी करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्य व कुलगुरु यांची राहील.

iii) विद्यापीठातील तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील सर्व अध्यापकांची मालमत्ता विवरणपत्रे तसेच लेखी सहमतीपत्रे विहीत मुदतीत प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य व संबंधीत विद्यापीठाच्या कुलगुरुंची राहील.

iv) अध्यापक लिखित सहमतीपत्राच्या (written undertaking) विरुध्द वर्तणूक करीत असल्याचे दिसून आल्यास त्यांच्या विरुध्द संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य व संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु यांनी कारवाई करावी.

११. **व्याप्ती** :- या शासन निर्णयातील तरतूदी राज्यातील सर्व उच्च शिक्षणाचे पारंपारीक आणि अभियांत्रिकी / वास्तूशास्त्र / अध्यापकीय / औषधनिर्माणशास्त्र / व्यवस्थापनशास्त्र इ. व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्था / महाविद्यालयांना व सर्व विद्यापीठांना लागू राहतील.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेतांक क्रमांक २०१००२२४१५१५४८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(विकास तु.कदम)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति**, (१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई. (२) मा. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे (३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव (४) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (५) मा. मंत्री, (उवतंशि), यांचे खाजगी सचिव (६) मा. राज्यमंत्री, (उ.व.तं.शि.) यांचे खाजगी सचिव. (७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे. (८) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (९) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे (१०) सर्व कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (११) निवड धारिका विशि -३

** FS:P 71 **

# GOVERNMENT OF INDIA

## Ministry of Human Resource Development

## Departmentof Higher Education

## Integrated Finance Division

**NO.F. 23-212009-TS.ll : Dated: 9th March, 2010 : Shastri Bhawan, New Delhi**

To,
The Directors
National institutes of Technology

**Subject:** Revision of pay of teaching and other staff following the pay revision of scale of Government employees on the recommendation of **6th** CPC – clarification thereof.

Sir,

I am directed to refer to this Ministry's Orders No. 23-1/2008-TS.II dated 18th August 2009 and 16th September 2009 on the subject and to say that consequent upon the revision of pay of teachers and other staff following the pay revision of scale of Government employees on the recommendation of **6th** CPC, clarification have been sought from various quarters on the orders issued by this Ministry. After careful consideration of the various points, the following clarifications are hereby issued: -

**I.Non-compounded advance increments**

a) As advance increments are treated as integral to pay, grant of non-compounded advance increment at the rates mentioned in Paragraph 7 of this Ministry's Order No. 1-32/2006-Ull/UI (1) dated 31st December 2008 and No. 23-1/2008-TS.ll dated 18th August 2009 would apply only to (a) ***Direct*** recruit lectures in the pre-revised scale of Rs, 8000-13500 appointed between 1.1.2006 and 17th August 2009 and **(b)*Direct recruit*** Assistant Professors in the revised pay of PB-3 ***with*** AGP of Rs. 6000 ***from*** 18th August 2009 onwards. Therefore, the decision on the non-compounded advance increments as communicated vide this Ministry's letter referred to above dated 31st August 2008 and 18Ih August 2009 will not be applicable for those faculty who were appointed up to **31st** December 2005. Those appointed prior to 1.1.2006 will be governed by instructions in the force.

b) Advance increments mentioned in the abovementioned Orders dated 31st December 2008 for completion of Ph. D, PG Degree in Professional Courses **while in service** would apply to all the catagories of 'teachers'. However, the rate of advance increments mentioned in the above said Orders would apply only to those teachers who obtained Ph. D or PG Degree in Professional Course while in **service** post 1.1.2006 .Therefore, those teachers who had obtained Ph. D prior to 1.1.2006 **(either** prior to their entry into the service or while in service) are not eligible for advance increments as per the new rates mentioned in the above said order dated 31st December 2008.

c) Advance increments granted up to 3Ist December 2005 were to be **treated** integral to the pay and accordingly the revised pay as on 1.1.2006 may be calculated as per the pay fixation formula mentioned in CCS (Revised Pay) Rules 2008.

**II.. Pay fixation**

(i) Fixation of pay of all those who were in service up to 31st December 2008 may be done as per the formula given in the CCS (Revised Pay) Rules 2008 and the Fitment Tables communicated vide letter no. 3-112009-U1 dated 4th June 2009.

(ii) Pay of directly recruited Teachers on or after 1.1.2006 may be **fixed** at the entry level of the revised pay and the AGP as prescribed and as per the provision in the CCS (Revised Pay) Rules 2008.

**Ill. Revised Pay of Librarians. Deputy Librarians, Assistant Librarian, Director of Physical Education. Deputy Director of Physical Education, Assistant Director of physical Education.**

The revision of pay of Librarians, Deputy Librarians, Assistant Librarian, Director of Physical Education, Deputy Director of Physical Education, Assistant Director of Physical Education may be regulated strictly in accordance with the decisions communicated vide this Ministry's letter no. 1-32/2006-U2/U1 (i) dated 31st December 2008. To illustrate the college Librarians in NITs who were in the pre-revised scale of Rs. 8000-13500 should only be given the revised pay band of Rs.15600-39100 with AGP of Rs. 6000 and **re-**designated as Assistant Librarian.

**IV Revision of pay of Registrar. Deputy Registrar and Assistant Registrars**

For the incumbents on this post, the revised pay in pursuance of this Ministry letter no. 1-32/2006-U2/U1 (ii) dated 3Ist December 2008 should be allowed only to those possessing the qualifications and experience as prescribed in the above said Order. Further, for Deputy Registrars, placement in the revised pay in PB 4 with GP of Rs. 8700 will be applicable only on completion of 5 years service either In the pre-revised scale of pay of Rs. 12000-1 8300 ***or*** in the Revised pay in PB-3 with GP of Rs. 7600.

**V Pay fixation of faculty promoted under CAS.**

The benefit of higher initial pay for the direct recruits is not applicable for those promoted under CAS. For them the pay will be fixed as per Rule 7 ***of*** CCS (RP) Rules 2008.

**VI** The advance increments granted by the Selection Committee would not represent Equivalent years of service in the post for the purpose of **future** promotions or for grant of higher scale of pay.

VII Those who join the services after 1.1.2006 with advance increments awarded by the Selection Committee Board in the pre-revised scale of pay, their pay in the revised scale shall be fixed at the appropriate entry level of the Pay Band without any advance increment. However, if the existing emoluments are in excess of the pay fixed in the revised pay, the difference shall be allowed as personal pay, to be absorbed in future increments in pay.

Vlll The revised pay, advance increments and incentives for higher qualifications will be applicable from 1.I,2006 and other allowances from 1st September 2008.

IX In respect of faculty, Academic Grade Pay has been fixed slightly higher than the Grade Pay approved by the Central Government. However, the various entitlements like TA/DA, etc are required to be regulated as per the Grade Pay indicated in the CCS (RP) Rules, 2008 for corresponding categories of Central Government employees. Accordingly, the following mapping may be adopted.

| Academic Grade Pay | Equivalent Grade Pay for various entitlements like TA/ DA etc. |
|---|---|
| Rs. 6000 | Rs. 5400 |
| Rs.7000 | Rs. 6600 |
| Rs 8000 | Rs. 7600 |
| Rs. 9000 | Rs. 8900 |
| Rs. 9500 | Rs. 8900 |
| Rs. 10000 | Rs. 10000 |

Yours faithfully
Sd/
(Pratima Dixit)
Director(TC)

** AF:P 19 **

*मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व महाविद्यालयातील (अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायमस्वरुपी विना अनुदानित) प्राचार्य व अधिव्याख्यातांची पदे नियमित स्वरुपात भरण्याबाबत.*

# महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

*शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/(४३५/०९)/विशि - ३ : मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.: दिनांक :- ३० जानेवारी, २०१०*

संदर्भ : (i) मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दि. ०३.१२.२००८ रोजी दिलेले आदेश.

(ii) मा. सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी क्र. १३९४४/२००९ मध्ये दि. २९.०५.२००९ रोजी दिलेले आदेश.

(iii) शासन परिपत्रक क्र. एनजीसी - २००८/(३७९/०८)/मशि - ३ दि. ७ मार्च, २००९.

**प्रस्तावनाः** देशाची प्रगती होण्यासाठी तसेच जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी नागरिकांस दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. भविष्यातील सुज्ञ नागरिक घडविण्यामध्ये उच्च शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार राज्यातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याची सर्व जबाबदारी विद्यापीठाचे कुलगुरु व त्यांचे सर्व अधिकारी यांची असते. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण इत्यादी प्राधिकरणाकडून सुध्दा वेळोवेळी निर्देश देण्यात येतात.

२. तथापी, गेल्या काही वर्षापासून असे निदर्शनास आले आहे की, एका बाजुला जागतिक स्तरावर उच्च शिक्षणाचा दर्जा वाढत असून दुस-या बाजुला राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा मात्र घसरत आहे. याबाबत समाजातील विविध घटक तज्ञांकडून व तसेच मा. कुलपती यांच्या अध्यक्षेतखालील कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) वेळोवेळी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संदर्भात मा. न्यायालयानेही वेगवेगळया याचिकांमध्ये निर्णय देतांना चिंता व्यक्त केली आहे.

३. मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) तसेच मा. उच्च न्यायालयाने निरनिराळया याचिकांमध्ये निर्णय देतांना उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व शिक्षणाच्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत राज्यातील विद्यार्थी टिकून रहावेत यासाठी योग्य ती पावले उचलण्यासाठी शासनाला व विद्यापीठांना आदेशित केलेले आहे.

४. शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षेप्रमाणे वाढ न होण्याची व शिक्षण क्षेत्रामध्ये घसरण होण्याच्या अनेक कारणांपैकी राज्यातील महाविद्यालयीन प्राचार्यांची व अध्यापकांची (अर्हताप्राप्त) पदे न भरणे हे एक मुख्य कारण असल्याचे प्रकर्षाने दिसून आले आहे. या बाबतीत मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दि. ३.१२.२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेतः-

(a) Each individual case of such private colleges would be evaluated as on 15th March, 2009 so as to note down the steps taken to fill in the post of Principal.... up to 31st May, 2009.

(b) The Colleges which fail to fill in the post of Principal by 31st May, 2009*. Prohibiting admission in the first year ... the names of such defaulting colleges would be notified in the local newspapers..... state level ....... regional level.

(c) If the students are admitted ....... in the first year, the University will not grant enrolment ...... nor ...... permit ...... to appear for the examination.

(d) The Colleges which would continue to be the defaulters in the next academic year (2010-11), the University will prohibit the admissions ....... the University will be ....... withdraw/cancel the affiliation of such Colleges. Undoubtedly the University will follow the due process ....... when it proceeds to withdraw/cancel the affiliation.

(e) The name of the colleges where admission have been prohibited ...... intimated ....... to the Joint Director of Higher Education every year with a request to take appropriate stringent measures which the Government may direct.

(f) The University will prepare data ....... who are eligible for appointment to the post of Principal and such list shall be circulated to all privated colleges (aided and non aided) on or before 31st January, 2009.

५) मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) व त्याचप्रमाणे शासन स्तरावरुन घेण्यात आलेल्या बैठकांमधून कुलगुरु, कुलसचिव, प्राचार्य इत्यादींना वेळोवेळी अवगत करुन त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याचप्रमाणे सर्व विद्यापीठांकडून याबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाली असल्याचे अपेक्षीत आहे.

६) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये आदेशित केल्याप्रमाणे प्राचार्यांची सर्व रिक्त पदे दि. ३१ मे, २००९ पर्यंत भरणे अनिवार्य होते. मात्र, विशेष अनुमती याचिका क्र. १३९४४/२००९ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मुदत वाढ लक्षात घेता ही सर्व पदे आता मे, २०१० पर्यंत भरणे आवश्यक आहे.

७) मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशामध्ये अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबरोबरच राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या संदर्भात आवश्यक असलेल्या सर्वतोपरी उपाययोजना,आवश्यक ती पावले उचलण्याबाबतचे आदेश राज्य शासनास दिलेले आहेत. मा. न्यायालयाचे वरील निर्णय विचारात घेऊन अशासकीय अनुदानीत / विनाअनुदानीत / कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य / अध्यापक त्याचप्रमाणे अकृषी विद्यापीठातील अध्यापकांची रिक्त पदे विहीत मुदतीत भरण्यासंदर्भात शासन स्तरावरुन आवश्यक ते आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशातील इतर बाबींवर स्वतंत्ररीत्या आदेश निर्गमीत करण्यात येतील.

शासन निर्णय

८) अशासकीय अनुदानीत / विनाअनुदानीत / कायम विनाअनुदानीत / महाविद्यालयातील प्राचार्य / अध्यापक त्याचप्रमाणे अकृषी विद्यापीठातील अध्यापकांची रिक्त पदे विहित मुदतीत भरणे.

(i) मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व महाविद्यालयानी प्राचार्यांची त्याचप्रमाणे अध्यापकांची सर्व रिक्त पदे दि. ३१.५.२०१० पूर्वी भरावीत.

(ii) महाविद्यालयातील प्राचार्य/अध्यापकांची रिक्त पदे उक्त विहीत मुदतीत भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ व संबंधीत विद्यापीठाच्या कुलगुरुंची राहील.

(iii) वरीलप्रमाणे कार्यवाही न करणा-या महाविद्यालयाविरुध्द संबंधीत विद्यापीठाने मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. (उदा. प्रथम वर्षामध्ये प्रवेश बंदी, परीक्षेस बसण्याची परवानगी न देणे, असंलग्नीकरण, इत्यादी)

(iv) संबंधीत विद्यापीठाच्या कुलगुरुंनी त्यांच्या नियंत्रणाखाली महाविद्यालयांमधील प्राचार्य/अध्यापक पदाबाबतचा वेळोवेळी सर्वंकष आढावा घ्यावा व दि. ३१ मे, २०१० पर्यंत भरण्यात आलेल्या व रिक्त असलेल्या पदाबाबतची वस्तुस्थिती महाविद्यालय निहाय संबंधित सहसंचालक यांना दिनांक १५ जून २०१० पर्यंत सादर करावी.

(v) ज्या अनुदानीत महाविद्यालयांनी वर नमुद विहीत मुदतीत प्राचार्य / अध्यापकांची पदे भरली नाहीत त्या महाविद्यालयाचे वेतन अनुदान दि. ३१.५.२०१० नंतर शासनाकडून बंद करण्यात येईल.

(vi) सर्व अकृषी विद्यापीठातील अध्यापकांची रिक्त पदे सुध्दा महाविद्यालयातील प्राचार्य / अध्यापकांप्रमाणेच दि. ३१.५.२०१० पूर्वी भरणे अनिवार्य राहील.

(vii) सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानीत / कायम विनाअनुदानीत महाविद्यालयामधील अध्यापकांची रिक्त पदे विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या विनियमनानुसार अर्हताधारक (Qualified), मान्यताप्राप्त (Approved), आणि नियमित (Regular), स्वरुपाच्या तत्वावर भरणे अनिवार्य राहील.

९. वरील आदेशाप्रमाणे कार्यवाही न करणा-या आणि दोषी आढळून आलेल्या महाविद्यालयांविरुध्द जर संबंधित विद्यापीठांनी त्वरीत कार्यवाही केली नसल्याचे सिध्द झाले तर संबंधीत विद्यापीठ दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

१०. हा शासन निर्णय राज्यातील सर्व उच्च शिक्षण / अभियांत्रिकी / वास्तूशास्त्र / अध्यापकीय / औषधनिमाणशास्त्र / व्यवस्थापनशास्त्र इ. व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्था, महाविद्यालय व सर्व विद्यापीठांना लागू राहील.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेतांक क्रमांक २०१००१३०१५०८१०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(रा.गो. जाधव)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

** FS:P 87 **

*पीठासीन अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, नागपूर यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, अमरावती या न्यायाधिकरणाच्या पीठासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत.*

# महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

### शासन निर्णय क्र. युएसजी २००९/(४०२/०९)विशि - १,
### मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२,
### दिनांक २४ फेब्रुवारी, २०१०

**वाचा:**- (१) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १३९१/(२०८९)/विशि- दि. १९ ऑगस्ट, १९९५ व समक्रमांकित शासननिर्णय, दि. १२ जानेवारी, १९९६. (२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. युएसजी २००५/(१२१/०५)/विशि-४, दि. १०.०१.२००६. (३) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. अे. १२१५/२००७, दि. २३ सप्टेंबर, २००८. (४) शासन निर्णय क्र. युएसजी २००९/(४०२/०९)-विशि-१, दिनांक ४ डिसेंबर, २००९.

**प्रस्तावना** :- न्यायमुर्ती श्री. एस.जी. महाजन, पीठासन अधिकारी,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधीकरण, नागपूर यांना संदर्भिय दि. १० जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, अमरावती या न्यायाधिकरणाच्या पीठासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कायभार सोपविण्यात आला होता. त्यांचा हा ३ वर्षाचा कालावधी दि. २४ जानेवारी, २००९ रोजी संपुष्टात आलेला आहे.

२. आता, शासन निर्णय क्र. युएसजी २००९/(४०२/०९)-विशि-१, दिनांक ४ डिसेंबर, २००९ अन्वये मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर. डोणगांवकर (सेवानिवृत्त) यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, नागपूरचे पीठासन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकारण, अमरावती येथील रिक्त असलेल्या पीठासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याची बाब विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

३. मा. न्यायमूर्ती श्री. एस. आर.डोणगांवकर (सेवानिवृत्त), पीठासन अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, नागपूर यांचेकडे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, अमरावती या न्यायाधिकरणाच्या पीठासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे. त्यांनी सदर पदाचा कार्यभार लवकरात लवकर स्विकारावा व त्याबाबतचा अहवाल शासनास पाठवावा.

४. मा. न्यायमूर्ती श्री. एस.आर. डोणगांवकर (सेवानिवृत्त) यांना शासन निर्णय, उच्च व तंत्र आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी १३९१/(२०८९)विशि-४, दिनांक १९ ऑगस्ट, १९९५ मध्ये नमुद केलेल्या सेवाशर्ती लागू असतील.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१००२२४१४३३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

स्वाक्षरी
(विकास तु.कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति, (१) मा. कुलपतींचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई. (२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, (३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, (४) मा. मंत्री (उ.व.त.शि.) यांचे खाजगी सचिव, (५) मा. राज्यमंत्री (उ.व.त.शि.) यांचे खाजगी सचिव, (६) कुलसचिव, सर्व विद्यापीठे (७) सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण (८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुबई/नागपूर (९) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (१०) जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नागपूर (११) जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, पुणे (१२) प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई (१३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक (१४) मा. न्या. श्री. एस.आर. डोणगांवकर, पीठासन अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (१५) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने, (१६) निवड नस्ती.

*** AF:P 25 ***

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **30.03.2010**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

----------------------------------------------------

To,..............................................................

................................................................

................................................................

................................................................

................................................................